# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज दोन्ही सभागृहात विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे कामकाजात व्यत्यय आला.

राज्यसभेत कामकाज सुरु झाल्यावर भाजप खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी वक्फ सुधारणा विधेयकासंबंधी नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर केला. त्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज २० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आलं होतं.

लोकसभेतही या अहवालाच्या मुद्यावरुन विरोधकांनी गदारोळ केला. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधी सदस्यांना सभागृहाला सूचीबद्ध कामकाज सुरू करण्याची परवानगी देण्याची वारंवार विनंती केली. अहवाल सादर झाल्यानंतर सदस्यांना बोलण्याची परवानगी दिली जाईल, असं त्यांनी सांगितलं. मात्र विरोधकांचा गोंधळ सुरूच राहिल्याने लोकसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत स्थगित झालं.

दरम्यान, लोकसभेत आज आयकर विधेयक २०२५ सादर केलं जाणार आहे. आयकराशी संबंधित कायद्यांचं एकत्रिकरण आणि काही सुधारणा करण्याच्या उद्देशानं हे विधेयक तयार करण्यात आलं आहे.

****

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. रेडिओच्या महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणं आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी, दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. ‘रेडिओ आणि हवामान बदल’ ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेडिओ दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहे. रेडिओ हे सर्जनशीलतेचा उत्सव साजरं करणारं एक शक्तिशाली माध्यम असल्याचं, त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. रेडिओ जगताशी संबंधित सर्वांचं

पंतप्रधानांनी कौतुक केलं. येत्या २३ तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमासाठी नागरीकांना विचार आणि सूचना पाठवाव्या, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

जागतिक रेडिओ दिनानिमित्त माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी आज नवी दिल्ली इथं रेडिओ महोत्सव २०२५ चं उद्घाटन केलं. यावेळी आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर उपस्थित होत्या.

****

भारतात सौर क्रांतीला प्रोत्साहान देणाऱ्या पीएम सूर्य घर योजनेला आज एक वर्ष पूर्ण झालं. घराच्या छतावर सौरसंच बसवण्याची सुविधा देऊन घरांना विनामूल्य वीज उपलब्ध करून देणं हा या योजनेचा उद्देश आहे. २७ जानेवारी २०२५ पर्यंत, या योजनेचा सुमारे साडेआठ लाख कुटुंबांना लाभ झाला आहे.

****

मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला भेट दिली. जेएनयु विद्यापीठातल्या छत्रपती शिवाजी महाराज अध्यासनासाठी या आर्थिक वर्षात दोन कोटी रुपये देण्यात येतील, तर पुढच्या आर्थिक वर्षात सात कोटी रुपये देण्यात येणार असल्याचं सामंत यांनी सांगितलं. तालकटोरा स्टेडियम इथं होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळाचीही त्यांनी पाहणी केली. २१ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन होणार आहे. सामंत यांनी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.

****

बालकांच्या हक्कांचं संरक्षण आणि सुरक्षित भविष्यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाकडून सोमवारपासून बालरक्षा अभियान राबवण्यात येणार आहे. बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा यांनी काल ही घोषणा केली. हा उपक्रम फेब्रुवारी आणि मार्च २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर, अकोला, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये बालरक्षा अभियान कार्यशाळांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या परळी इथले व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणातल्या आरोपींना पकडून न्याय देण्याची मागणी, त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी पोलीस

अधिक्षकांना केली आहे. येत्या दहा दिवसात आरोपींवर कारवाई झाली नाही, तर कुटुंबासोबत आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

****

गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी अभियानासाठी जाताना रवीश मधुमटके या पोलिस शिपायाचा हृदयविकाराच्या झटक्यानं काल मृत्यू झाला. भामरागड तालुक्यात ही घटना घडल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

वर्ध्याच्या यशवंतराव दाते संस्थेतर्फे दिला जाणारा अंजनाबाई इंगळे स्त्रीवादी साहित्य पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ.दादा गोरे यांच्या 'स्त्रीयांचे समकालीन साहित्य' या ग्रंथास जाहीर झाला आहे. पुढील महिन्यात वर्धा इथं संस्थेच्या व्याख्यानमाला आणि साहित्य सोहळ्यात गोरे यांना पुरस्कार प्रदान केला जाईल.

****

बीड जिल्ह्यातल्या धर्मापुरी इथं संवाद ॲपवर मिळालेल्या माहितीवरुन साडे तेरा लाखांचा गुटखा काल जप्त करण्यात आला. ॲपवर परळे पोलिस स्टेशन हद्दीत प्रतिबंधीत असलेला गुटखा, तंबाखुजन्य पदार्थ असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांनी ही कारवाई करत, दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

****

येत्या चौदा तारखेला, छत्रपती संभाजीनगर इथं पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा होणार आहे. वाळूज औद्योगिक परिसरातल्या श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी, हायटेक महाविद्यालय परिसर, इथं होणाऱ्या या मेळाव्यात नामांकित कंपन्यांमधल्या साडे पाचशेहून अधिक पदांसाठी मुलाखती होणार आहेत. इच्छुकांनी विभागाच्या डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट रोजगार डॉट महा स्वयम डॉट जीओव्ही डॉट इन, या संकेतस्थळावर नोंदणी करून मेळाव्याला उपस्थित राहावं, असं आवाहन जिल्हा कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी केलं आहे.

****